https://chiranjivpad.khandbahale.org/



शांतिब्रह्म श्री संत एकनाथ महाराज

ग्रंथकार

- जीवन
  - जन्म-पुण्यतिथी
    - पैठण, इ.स. १५३३ - १५९९ (६६ वर्ष)
  - आई-आई
    - रुक्मिणी आणि सूर्यनारायण
  - आजोबा - आजी
    - चक्रपाणी आणि सरस्वती
  - पणजोबा
    - संत भानुदास
  - गुरु
    - शिष्य परंपरा: नारायण (विष्णू) > ब्रह्मदेव > अत्री ऋषी > दत्तात्रेय > जनार्दनस्वामी > संत एकनाथ म.)
    - सद्गुरु जनार्दनस्वामी, देवगड (देवगिरी)
  - पत्नी
    - गिरिजाबाई, (वेजापूर)
  - आपत्य
    - गोदावरी व गंगा (मुली) व हरी (मुलगा)
- निवडक साहित्य-लेखन
  - एकनाथी भागवत
    - भागवत पुराणातील अकराव्या स्कंधावर ओवीबद्ध मराठी टीका
  - एकनाथी ओवीबद्ध मराठी
    - भावार्थ रामायण
    - एकनाथी अभंग गाथा
    - चिरंजीवपद
    - रुक्मिणीस्वयंवर
    - शुकाष्टक टीका
    - स्वात्मबोध
    - आनंदलहरी
    - हस्तमालक टीका
    - चतु:श्लोकी भागवत
    - गुढाचिलास
    - लघुगीता
    - अनुभवानंद
    - ब्रिदावळी
  - हरिपाठ - एकूण २५ अभंग
  - अभंग, गवळणी व भारूडे
- ठळक कार्य
  - संत श्री ज्ञानेश्वर माउलींच्या समाधिस्थळाचा शोध
  - माउलींच्या समाधी व मंदिराचा जिर्णोद्धार
  - माउलींची नित्यपूजा व समाधी सोहळ्याची कार्तिकी यात्रा सुरु केली.
  - संत श्री ज्ञानेश्वर माउलींच्या ज्ञानेश्वरीचे शुद्धीकरण

चिरंजीव पद

साधक अधिकार, आचार विचार विवेचन करणारा ४२ ओव्यांचा लघुग्रंथ

- ऑनलाईन चिरंजीव पद (अर्थसहित)
- डाउनलोड चिरंजीव पद (अर्थसहित)

ग्रंथाचा अनुबंध चतुष्टय

- १. अधिकारी
  - मुमुक्षु = मोक्षाची तीव्र इच्छा असलेला साधक
    - अनुताप असलेला साधक / मुमुक्षु
      - अनुताप कशाबद्दल?
        - १. परमार्थापासून च्युत झाल्याबद्दल अनुताप
        - २. दुर्लभ नरदेहाचा विषयसेवनासाठी दुरुपयोग केल्याबद्दल अनुताप
      - अनुतापाचे स्वरूप काय?
        - 'अनुताप' म्हणजे प्राप्त परिस्थिती अनिष्ट म्हणून तळमळ व इष्ट परिस्थितीची अनिवार ओढ. मृत्यू केव्हा उडी घालील याचा नेम नाही. असे जाणून तो देहविषयक सुखलालसा सोडून देणे.
    - साधकास प्रतिबंध
      - पंचविषय प्रतिबंध
        - पंचविषय प्रतिबंध = शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध असे पाच विषय आहेत, ते साधकांना नाडतात.
        - १. शब्द
          - परमार्थाला लागलेला विरक्त पुरुष पाहून लोक त्याची स्तुती करतात, पूजा, मान-सन्मान करतात. साधकाला ते गोड वाटू लागते, त्यामुळे तो त्यात रमतो, अडकतो. हा शब्द-विषयक प्रतिबंध आहे. जसे. शब्दविषयात आसक्त होऊन हरीण मरण पावते.
        - २. स्पर्श
          - लोक साधकाला बसायला लोड, तक्के, गाद्या वगैरे मऊ आसने घालतात. राहायला घर, आश्रम, झोपायला पलंग वगैरे देतात, आणि नरनारी सेवा-सुश्रूषा करतात, त्यामुळे त्याला 'स्पर्श' विषयक गोडी लागते. हा साधकास स्पर्श-विषयक प्रतिबंध आहे. जसे. स्पर्शविषयात आसक्त होऊन हत्ती नाश पावतो.
        - ३. रूप
          - लोक साधकाला चांगली वस्त्र व अलंकार देतात. त्यायोगे देहाच्या सौंदर्यात तो गुरफटतो, मोठेपणा, डौल, थोरपी मानतो. यामुळे त्याला देहाभिमान होतो. हा साधकास रूप-विषयक प्रतिबंध आहे. जसे. रूप विषयाच्या सेवनाने पतंगाचा नाश होतो.
        - ४. रस
          - लोक त्याला चांगले पदार्थ खावयाला देतात. त्या रसगोडीमुळे तो भक्तांविषयी ममता धरून राहतो. हा साधकाला होणारा रस-विषयक प्रतिबंध आहे. जसे. रसविषयाने माशांचा नाश होतो.
        - ५. गंध
          - लोक त्याला अत्तर, गुलाब, बुक्का, केशराची उटी लावतात. त्याचा सुगंध त्याला आवडतो. हा साधकास गंध-विषयक प्रतिबंध आहे. जसे. गंध विषयाने भ्रमर मरण पावतो.
        - पंचविषयक प्रतिबंधाचा परिणाम काय?
          - निर्लज्जपणा
          - लोक साधकाची निंदा करतात परंतु तो साधक भक्तांविषयी ममत्व धरतो.
      - प्रतिबंध निवृत्ती / उपाय काय?
        - चतुराश्रमानुसार पंचविषयक विरक्ती
          - साधकाच्या ठिकाणी असलेल्या (१) ब्रह्मचर्य, (२) गृहस्थ, (३) वानप्रस्थ आणि (४) संन्यास या आश्रमांनुसार विरक्ती असावी.
          - विरक्त कसा असतो
            - मान-पान मिळतो अशा ठिकाणी न राहता, लौकेषणा त्याग करून सत्संगात राहतो
              - सत्संगात राहतो
            - संप्रदाय उभारीत नाही, देवाची सोडून कोणाचीही तो स्तुती करत नाही.
              - संप्रदाय उभारीत नाही
            - लोकांमध्ये राहणे, बोलणे टाळतो, गोड खाणे त्यास आवडत नाही
              - संन्यासावस्थेत राहतो
            - चांगले कपडे, पक्वान्न, धन दागिने आवडत नाही.
              - भोगवादी नसतो
            - ब्रह्मचारी तसेच संन्याशी साधक एकांतात स्त्री/पुरुष सोबत बोलत नाही, त्यांच्याकडून सेवा करवून घेत नाही. गृहस्थाश्रमी साधक असल्यास फक्त गरजेपुरताच स्व स्त्री/पुरुष संग ठेवतोते.
              - स्त्री/पुरुष संग परित्याग
            - लोकांत नव्हे तर एकांतात नि:संग व निरभिमान होऊन राहतो.
              - एकांतात बसतो
            - गरजेपुरतीच कोरडी भिक्षा मागून उदरनिर्वाह करतो.
              - कोरान मागून खातो
- २. विषय
  - श्री जनार्दन स्वामींचे शिष्य शांतिब्रह्म श्री एकनाथ महाराज, आपले स्वकर्तव्य म्हणून वैराग्य व ज्ञान प्राप्तीसाठी भगवान श्रीकृष्णाने उद्धवाला सांगितलेल्या उपदेशाचे चिरंजीव पद या ग्रंथात प्रतिपादन करतात.
    - श्रीकृष्णाने उद्धवाला केलेला हितोपदेश
- ३. प्रयोजन / फल
  - "चिरंजीवपद" म्हणजे अविनाशी व अवीट असे निरतिशय-आनंदरूप-मोक्ष सुख
    - मोक्ष
      - परमानंदाची प्राप्ती
      - संसारदु:खाची आत्यंतिक निवृत्ती
- ४. संबंध
  - संबंध :- अधिकारी, विषय आणि प्रयोजन यांचे परस्परसंबंध
    - फल व अधिकारी यांमध्ये प्राप्यप्रापकभाव
    - अधिकारी व विषय यांमध्ये कर्तृकर्तव्यभाव
    - विषय व ग्रंथ यांमध्ये प्रतिपाद्यप्रतिपादकभाव
    - विषय व ग्रंथ यांमध्ये जन्यजनकभाव

राजस व तामस वैराग्य संतांना मान्य नाही

- राजस व तामस वैराग्य संतांना मान्य नाही. कारण त्यायोगे परमात्मा भेटत नाही. उलट ते अनार्थास कारण होते.
- वैराग्य प्रकार
  - १. तामस
    - तामस वैराग्य = वेदविधी, आचार-विचार, सत्कर्म ज्याला माहीत नाही. कर्मधर्मात जो भ्रष्टाचार करतो, अशा पुरुषाचे वैराग्य 'तामस' म्हणजे अपवित्र होय.
  - २. राजस
    - 'राजस' वैराग्य = लोकेषणा हेतूने (बाह्यत:) त्याग करणे व सत्संग सोडून पूजा घेणे, आणि (शिष्यांकरिता आपलेपणा) धरून राहणे.
  - ३. सात्विक
    - सात्विक वैराग्य = विषयाची सर्व भोगेच्छा टाकून देणे. प्रारब्धानुसार भोग प्राप्त झाले तरी त्यात लिप्त न होणे.
- वैराग्य
  - नित्य अनुताप केल्यामुळे 'वैराग्य' प्राप्त होते
    - अनुतापाचा परिणाम काय?
      - अनुताप कशाबद्दल?
        - १. परमार्थापासून च्युत झाल्याबद्दल अनुताप
        - २. दुर्लभ नरदेहाचा विषयसेवनासाठी दुरुपयोग केल्याबद्दल अनुताप
      - अनुतापाचे स्वरूप काय?
        - 'अनुताप' म्हणजे प्राप्त परिस्थिती अनिष्ट म्हणून तळमळ व इष्ट परिस्थितीची अनिवार ओढ. मृत्यू केव्हा उडी घालील याचा नेम नाही. असे जाणून तो देहविषयक सुखलालसा सोडून देणे.